महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२१/ बारावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/ प्रवेशाचा अंतिम दिनांक /८२१ दिनांक : १८/१०/२०२१

## प्रवेशासाठीचा सुधारित अंतिम दिनांक
## शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रथम वर्ष एचएससी (बारावी नंतरचे) पदविका औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान, सरफेस कोटींग तंत्रज्ञान अभ्यासक्रम

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता पोस्ट एचएससी पुर्णवेळ पदविका औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान, सरफेस कोटींग तंत्रज्ञान अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ संचालित व खाजगी विनाअनुदानित पदविका शैक्षणिक संस्थांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशप्रक्रियेसाठी सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक, संस्थांनी डेटा अपलोड करण्याची शेवटचा दिनांक या प्रक्रियेच्या वेळापत्रकामधील बदलांच्या माहितीसाठी ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

| अनु. | प्रक्रिया | सुधारित दिनांक |
|---|---|---|
| १. | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठीच्या सर्व प्रकारच्या प्रवेशांसाठी अंतिम दिनांक | २५-१०-२०२१ |
| २. | संस्थांसाठी: डेटा अपलोड करण्याची शेवटची तारीख (प्रवेशित झालेल्या उमेदवारांचा तपशील) | २६-१०-२०२१ |

टिप:

१. प्रवेशप्रक्रियेच्या कॅप व्यतिरिक्त जागांसाठी ऑनलाईन नोंदणी व कागदपत्रांची पडताळणी, अर्ज निश्चिती करणे या प्रक्रिया प्रवेशाच्या अंतिम तारखेपर्यंत (कट ऑफ डेट पर्यंत) सुरू ठेवल्या जातील.

२. संस्थास्तरावरील कोट्यामधे व कॅपनंतर रिक्त राहिलेल्या जागांत प्रवेश घेण्यास इच्छुक उमेदवारांनी ई-स्क्रुटनी पध्दत किंवा प्रत्यक्ष स्क्रुटनी पध्दत याद्वारे नोंदणी, कागदपत्रांची पडताळणी व अर्ज भरल्याची निश्चिती करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी प्रवेशासाठी संस्थांमध्ये स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांची गुणवत्तायादी, संस्था पातळीवर संस्थेद्वारे तयार केली जाईल.

३. ज्या उमेदवारांनी प्रत्यक्ष स्क्रुटनी पध्दतीचा पर्याय निवडला आहे असे उमेदवार सुविधा केंद्रात उपलब्ध असलेल्या आयटी सुविधेचा वापर करून त्यांचे अर्ज भरणे, स्कॅनिंग करणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि अर्ज निश्चित करणे या कामाकरिता विनाशुल्क लाभ घेऊ शकतात. उमेदवार सुविधाकेंद्रांवर (एफसी) उपस्थित असताना, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या कोविड -१९ च्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करतील.

४. प्रत्यक्ष स्क्रुटनी पध्दतीसाठी : सुविधाकेंद्रांची (एफसीची) यादी संकेतस्थळावर उपलब्ध आहे आणि ही सुविधाकेंद्रे नियोजित काळात सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

५. प्रवेशासाठी पात्रता व नियम संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

६. वरील घोषित वेळापत्रक हे अस्थायी स्वरुपाचे आहे आणि यामधे अपरिहार्य स्थितीमधे बदल संभवु शकतो. जर, सुधारित वेळापत्रक घोषित झाले तर ते http://posthscdiploma2021.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल. अधिक माहितीकरिता संकेतस्थळावर अथवा संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्या कार्यालयामध्ये संपर्क साधावा.

७. कोविडच्या १९ - पार्श्वभूमीवर खबरदारी घेण्यासंदर्भात संचालनालयाकडून प्रसिद्ध केलेली प्रमाणित कार्यपद्धती, (SOP) तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाचे पत्ते व दूरध्वनी संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

८. चौकशी करिता व आयटी सुविधे करिता जवळच्या सुविधा केंद्राशी संपर्क साधावा.

९. मदतकक्ष क्रमांक 9028646040, 9699507665 सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सुरु असतील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, मुंबई